# निशाणी कमांक ७ वर आदेश पारीत

(दिनांक २७/४/२०१८)

१. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार कं. १ व २ यांनी त्यांना फौजदारी प्रकीया संहिता कलम १२५ नुसार दरमहा प्रत्येकी रुपये ५०००/- अशी अंतरीम खावटी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, ती गैरअर्जदाराची पत्नी असुन तिचे लग्न दिनांक २१.०६.२००७ रोजी महादुला, कोराडी, ता. कामठी, जिल्हा-नागपुर येथे हिन्दु रिती-रिवाजा प्रमाणे झाले. त्यानंतर ती गैरअर्जदारा कडे नांदायला गेली, तीला काही महिने चांगले वागवण्यात आले. त्यानंतर गैरअर्जदार व घरातील ईतर सदस्य तिच्या चारित्रावर संशय घेउन तिला शाररिक व मानसिक त्रास देउ लागले. गैरअर्जदार हा तिला माहेरी आणुन सोडायचा व त्याला नविन व्यवसाय सुरु करण्याकरीता अर्जदाराच्या आई -वडीला कडुन रुपये ५,००,०००/- घेउन येण्यास सांगायचा. अर्जदाराला गैरअर्जदार हा हिन दर्जाची वागणुक दयायचा असे अर्जदाराने कथन केले आहे. अर्जदार पुढे असे सांगते की, गैरअर्जदाराला अर्जदारापासुन घटस्फोट पाहीजे होता म्हणुन मा. दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर), भंडारा यांच्या न्यायालया मध्ये वैवाहीक संबंध पुन्हा प्रस्थापित करण्या करीता व पर्यायी घटस्फोट मिळण्या करीता अर्ज केला होता. परंतु सदरचा अर्ज अशंतः मंजूर करून अर्जदाराला तीचे वैवाहीक जीवन पुन्हा प्रस्थापित करण्याचा आदेश दिला यावरुन ती पुन्हा गैरअर्जदारा कडे नांदायाला गेली असता गैरअर्जदारानी तिला माहेरुन रुपये ५००,०००/- घेउन येण्यास भाग पाडत होता नाही तर तो पर्यत माझ्या घरी पाय ठेवायचा नाही असे म्हणुन तिला परत करीत होता. अर्जदार चे कथना प्रमाणे, गैरअर्जदाराच्या त्रासा मुळे ती अर्जदार कं. २ ला घेवून आपल्या माहेरी राहत आहे. पुढे ती असे सांगते की, गैरअर्जदाराने त्यांच्या पालनपोषणाची

कोणतीही व्यवस्था केलेली नाही तसेच त्यांच्या  कडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती  बिकट असल्यामुळे ती न्यायालयात प्रत्येक तारखेला हजर राहु शकत नाही. अर्जदारा कडे स्व:तचे उदरनिर्वाहाचे साधन नाही. याउलट गैरअर्जदाराचा भांडे विक्रीचा तसेच रांगोळीचा व्यवसाय असून तो  दरमहा रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त कमवितो. करीता तिने स्वत: करीता व अर्जदार क्रमांक २ करीता दरमहा रुपये ५,०००/- प्रत्येकी अंतरिम खावटी मिळावी अशी विनंती केली आहे.

**३.** सदर अर्जावर आक्षेप म्हणुन गैरअर्जदाराने नि.क्र.६ वर आपले लेखी उत्तर दाखल केले. अर्जदारा सोबत असलेले नातेसंबंध त्याला वाद नाही तसेच अर्जदार ही गैरअर्जदार कडे नांदायला आली व लग्नासंबंधातुन अर्जदार क्रमांक २ यांचा जन्म झाला हयात सुध्दा वाद नाही. परंतु अर्जदाराला दिलेली कुर वागणुक, पैशाची मागणी या बाबतचे अर्जातील कथन त्याने स्पष्टपणे अमान्य केले आहे. गैरअर्जदारानी असे कथन केले की, अर्जदार ही त्याच्या कडे नांदायला येत नव्हती व आपल्या माहेरी निघुन जायची याकरीता त्याने अर्जदार क्रमांक १ विरुध्द वैवाहीक जिवन पुन्हा प्रस्थापित  करण्या करीता मा. दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर), भंडारा, यांच्या कडे प्रकरण दाखल केले परंतु त्या प्रकरणामध्ये अर्जदारा सोबत घ ाटस्फोट मिळण्याबाबतची प्रार्थना नाकारून अर्जदाराला वैवाहीक जिवन प्रस्थापित करण्याचे आदेश देण्यात आले. तरीसुध्दा अर्जदार कं. १ ही गैरअर्जदाराकडे नांदायला आली नाही आणि ती कोणतेही कारण नसताना गैरअर्जदारापासून वेगळी राहत आहे. गैरअर्जदार पुढे असे सांगतो की, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांच्या न्यायालयाने गैरअर्जदाराने दाखल केलेल्या  घटस्फोटाचे अपीली प्रकरण मंजुर केले असुन अर्जदार क्रमांक १ व गैरअर्जदार यांचा घटस्फोट झाला आहे. करीता सदरचा अर्ज हा ग्राहय धरता येणार नाही. अर्जदार स्व:त गैरअर्जदाराला सोडून गेली होती आणि तिने केवळ गैरअर्जदाराला  त्रास देण्याच्या उददेशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे तो सांगतो.  अर्जदार ही ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते त्यामधुन तिला दरमहा रुपये १०,०००/- मिळतात आणि त्यामुळे ती आपल्या उदरनिर्वाहास सक्षम आहे. याउलट गैरअर्जदाराकडे स्व:तचे उत्पनाचे

साधन नसुन तो त्याच्या वडीलाच्या दुकानाात काम करतो, त्याच्या वडिलांवर अवलंबुन असल्याचे तो सांगतो. गैरअर्जदार चे ठामपणे म्हणणे आहे की, नियमित फौजदारी अपील क्रमांक ९५/२०१५ मध्ये मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी आदेश पारीत करुन गैरअर्जदाराची घटस्फोटाची मागणी मान्य केली आहे आणि या करणास्तव अर्जदार ही सदरची खावटी मिळण्याकरीता असमर्थ आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी मागणी त्याने केली आहे.

४. प्रतिपक्षांचे परस्पर विरोधी कथनावरुन माइया समोर खालील मुददे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा पुढील प्रमाणे नोंदविले आहेत. आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्रं. १ व २ हे मागणी नुसार अंतरिम खावटी मिळण्याकरीता पात्र आहेत काय? | **.....अंश:ता होकारार्थी** |
| २. | अंतिम आदेश काय? | **अर्ज अंशता:मंजुर** |

## **कारणमिमांसा**

**मुद्‌दा क्रमांक १ व २ संबंधीत** –

**५.** दोन्ही बाजुचा परस्पर युक्तीवाद ऐकला अभिलेखावरील दस्ताऐवजाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार मधील नातेसंबंध ही गोष्ट विवादीत नाही. तसेच अर्जदार ही गैरअर्जदारापासून वेगळी राहते यात सुध्दा वाद नाही. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार हा तीला तीच्या आई वडीलांकडून रूपये ५,००,०००/–मागणी करून शारीरीक व मानसिक त्रास देत होता. परंतु गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार क्रं. १ हि स्वत: त्याला सोडून निघून गेली व तीने मा. दिवाणी न्यायधिश (वरीष्ठ स्तर), भंडारा यांनी दिलेले वैवाहिक जीवन प्रस्थापित करण्याबाबतचे आदेशाचे उल्लंघन केले आहे. परंतु अर्जदार असे सांगते की, ती वेगळी राहत असल्याकारणाने तीच्याकडे पुरेसे पैसे नव्हते करीता ती सदर

प्रकरणात हजर झाली नाही. गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे अपीली प्रकरण क्रं. ९५/२०१५ अन्वये गैरअर्जदाराला अर्जदार क्रं. १ पासून घटस्फोट मिळाला आहे या कारणाने उपरोक्त प्रकरणातील तीच्या मागण्या मान्य करता येणार नाही. गैरअर्जदार पुढे असे सांगतो की, अर्जदार क्रं. १ ही घटस्फोटीत महिला असून त्याच्या विरूध्द कोणताच हक्क उरलेला नाही. अर्जदार क्रं. १ ने तीचा गैर अर्जदारासोबत झालेला घटस्फोट मान्य केला पंरतु सदरच्या न्याय निवाडयाची प्रत तीला मिळाली नसल्याचे सांगीतले. अर्जदार क्रं.१ व गैरअर्जदार यांचा घटस्फोट झाला आहे हि गोष्ट विवादीत नाही. अशा परीस्थीतीत अर्जदार क्रं १ व २ हे गैरअर्जदारापासून अंतरीम खावटी मिळण्याकरीता सक्षम आहे किंवा कसे याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ स्पष्टीकरण (बी) च्या तरतुदीकडे बघणे अवचित्याचे ठरते. यामध्ये ''पत्नी'' या संज्ञेचे स्पष्टीकरण केले आहे. त्यानुसार ज्या महिलेला आपल्या पतीने घटस्फोट दिला असून किंवा तीने पतीपासून घटस्फोट मिळविलेला आहे पंरतु पुनर्विवाह केलेला नाही. अशी स्त्री ही खावटी मिळण्याकरीता सक्षम असल्याचे सांगीतले आहे. त्यामुळे एखादया घटस्फोटीत महिलेने पुर्नविवाह केला नसेल तर तीचे अस्तित्व पत्नीसारखेच असते हे म्हणणे वावगे ठरणार नाही. अर्जदार क्रं. १ ही गैरअर्जदाराची लग्नाची पत्नी आहे हे विवादीत नाही. तसेच अर्जदार क्रं. १ ने दुसरे लग्न केले असे हि गैरअर्जदार सांगत नाही. अशा परीस्थीतीत अर्जदार क्रं. १ ही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ च्या स्पष्टीकरण (बी) या व्याख्येत पूर्णपणे सिध्द होते. करीता तीचा अर्ज या क्षणाला नामंजूर करता येणार नाही.

**६.** अर्जदार सांगते की, गैरअर्जदाराकडे भांडे विक्रीचा व रांगोळीचा व्यवसाय आहे आणि त्याला यातून दरमहा रूपये ५०,००० चे उत्पन्न मिळते. पंरतु असा कोणताही कागदोपत्री पुरावा तीने अभिलेखावर दिला नाही. याउलट गैरअर्जदार सांगतो की, तो त्याच्या वडीलांच्या दुकानात कामाला आहे व अर्जदार क्रं. १ हि स्व:चा उदरनिर्वाह करू शकते. गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तो वडिलांच्या दुकानात कामाला आहे यावरून तो कमावता असल्याचे प्राथमिक दुष्टया सिध्द होते. अर्जदार क्रं. १ हि ब्युटीपार्लरचे व्यवसाय करते हे दाखविणारा दस्तावेज

गैरअर्जदाराने अभिलेखावर आणलेला नाही.

७. गैरअर्जदाराला नातेसंबध मान्य आहे. अर्जदार कं. १ पासून गैरअर्जदाराला घटस्फोट मिळाला आहे यात वाद नाही. अर्जदार कं. १ ने घटस्फोट मिळाल्यानंतर पुर्नविवाह केला असा कोणता ही प्राथमिक पुरावा अभिलेखावर आलानाही. त्यामुळे अर्जदार कं. १ हि अंतरिम खावटी मिळण्याकरीता सक्षम आहे. अर्जदार कं.२ हा गैरअर्जदाराचा मुलगा आहे यात वाद नाही. अर्जदार कं. २ च्या पालनपोषणा करीता गैरअर्जदाराने प्रयत्न केले किंवा कसे हे अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराला आपल्या नैतीक जबाबदारीतून अंग काढून घेता येणार नाही. करीता अर्जदार कं. २ हा सुध्दा अंतरीम खावटी मिळण्याकरीता सक्षम आहे असे ठरविणे चुकीचे होणार नाही. करीता अर्जदाराचे अर्ज अंशत: मंजूर करून अर्जदार कं. १ व २ यानां प्रत्येकी रूपये १,५०० अंतरीम खावटी मुख्य अर्ज निकाली काढण्यापर्यंत देण्यात येते. येणेप्रमाणे अंतिम आदेश

## आ दे श

(१) अर्ज नि. कं. ७ अशंत: मंजूर करण्यात येते.

(२) गैरअर्जदार हा अर्जदार कं. १ व २ यांना प्रत्येकी रूपये १,५०० (एक हजार पाचशे) दरमहा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून ते मूळ अर्जाच्या अंतिम निकाल लागेपर्यंत अतंरीम खावटी देईल.

(३) सदर आदेशाची प्रत अर्जदाराला विनामूल्य देण्यात यावी.

कामठी
दिनांक : २७/४/२०१८.

**(व्हि.म.गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्रमांक-४, कामठी.